पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८०**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **२८/०७/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **२८/०७/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.तरस बाळासाहेब जयवंत
३) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
४) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
६) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजन पाटील-सह शहर अभियंता, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.चव्हाण–सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.सवणे,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण-कार्यकारी अभियंता,मा.बेंडे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

सूचक – मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक – मा.विनायक गायकवाड

थोर शास्त्रज्ञ व भारताचे माजी राष्ट्रपती मा.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचे दुःखद निधन झाले असल्याने तसेच पंजाब मधील अतिरेकी हल्ल्यात बळी गेलेल्या नागरीकांना श्रद्धांजली वाहून सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

--------

**मा.सभापती** - सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८०**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २८.०७.२०१५ ची तहकूब सभा)**

दिनांक – **०४/०८/२०१५** वेळ – **सकाळी १०.४५ वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **२८/०७/२०१५**ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी **१०.४५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.तरस बाळासाहेब जयवंत
६) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७) मा.प्रसाद शेट्टी
८) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
९) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१०) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
११) मा.काळे विमल रमेश
१२) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१३) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.डोईफोडे-सहा.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.कडूसकर,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.निकम,मा.सवणे,मा.थोरात,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

सूचक – मा.विनायक गायकवाड अनुमोदक – मा.संपत पवार

मा.महापौर शकुंतलाताई धराडे यांच्या सासुबाई श्रीम.सखुबाई बाळासाहेब धराडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले असल्याने त्यांस श्रद्धांजली वाहून सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी ११.३० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

--------

**मा.सभापती** - सभा मंगळवार दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी ११.३० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १८०**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २८.०७.२०१५, ०४.०८.२०१५ (सकाळी १०.४५ वा.) ची तहकूब सभा)**

दिनांक – **०४/०८/२०१५** वेळ – **सकाळी ११.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक **०४/०८/२०१५** सकाळी १०.४५ची तहकूब सभा दिनांक ०४/०८/२०१५ रोजी सकाळी **११.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
११) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
१२) मा.काळे विमल रमेश
१३) मा.अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार
१४) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.गायकवाड,मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे,मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.लडकत,मा.खाबडे,मा.पिरजादे,मा.दांगट,मा.बरशेट्टी, मा.गलबले,मा.घोडे,मा.औंभासे,मा.गट्टूवार,मा.शेख,मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.बोदाडे,मा.बैंडे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

अ) दिनांक १४/०७/२०१५ व २१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक – १२०५५ विषय क्रमांक – १
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-३/कावि/४९०/२०१५ दि.१६/३/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कॉलेज ऑफ फिजीशियन अँण्ड सर्जन, मुंबई (सी.पी.एस.) या अभिमत विद्यापीठाच्या ११ वैद्यकीय शाखांच्या M.B.B.S. नंतरच्या सी.पी.एस. डिप्लोमा कोर्ससकरीता आवश्यक असणा-या मुख्य पी.जी.टिचर्स व असिस्टंट पी.जी.टिचर्स करीता प्रस्तावात नमुद यादीतील डॉक्टरांची मानसेवी पदावर र.रु.५,०००/- (अक्षरी र.रू.पाच हजार फक्त) प्रति महीना दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०९/२०१५ या सहा महिने कालावधीसाठी नेमणुक करणेकामी व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०५६ विषय क्रमांक – २
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/५५/२०१५ दि.११/६/२०१५
विषय - प्र.क्र.७ च-होली पुणे आळंदी रस्ता ते खाणीचा रस्ता डांबरी करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०५७ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/५४९/२०१५ दि.१६/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील कॉरीडॉर, अंतर्गत व बाह्य परिसराची यांत्रिक पध्दतीने तसेच मनुष्यबळाव्दारे दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणे या कामासाठी आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत ई-निविदा नोटीस क्र.२/२०१३-१४ प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार पात्र निविदाधारकांपैकी कमी दर सादर केलेल्या मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. यांना सदर काम देणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.५७२५, दि.२८/१/२०१४ अन्वये मान्यता मिळाले नंतर आवश्यक तो करारनामा करुन आदेश क्र.आ.मु.का./४/कावि/३०५/ २०१४, दि.२९/३/२०१४ अन्वये दि.१/४/२०१४ ते दि.३१/३/२०१५ या १ वर्ष कालावधीसाठी मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. यांची ठेकेदार म्हणून नियुक्ती केली आहे. सदर कामासाठी नविन निविदा काढणेची कार्यवाही सुरु असल्याने व त्यास काही कालावधी लागणार असल्याने तसेच म.न.पा. मुख्य इमारत दैनंदिन स्वच्छतेचे काम नियमितपणे होणे आवश्यक असल्याने

सद्यस्थितीत कार्यरत असलेले मे.सुमित फॅसिलिटीज प्रा.लि. यांना दि.१/४/२०१५ पासून २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणे, याकामी त्यांचेशी करारनामा करुन कामाचे आदेश देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०५८ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१५२/१५ दि.१/७/२०१५

विषय - प्राधिकरण प्र.क्र.१७ मधील संभाजी चौक ते म्हाळसाकांत चौकापर्यंतचा रस्त्यास IRS प्रमाणे फुटपाथ तयार करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०५९ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/५६६/१५ दि.८/७/२०१५

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागाकरिता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीकामी नि.सु.क्र.१/२०१५-१६ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदे मधील मे.निर्मीती इंजिनिअरिंग कार्पो. यांचे बाब क्र. १, २, ४ व ५ साठी र.रू. ५,०९,४७०/- व मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, चिंचवड यांचे बाब क्र.३ करिता र.रू.२,७४,५६०/- असे एकूण र.रु.७,८४,०३०/- (अक्षरी र.रू. सात लाख चौऱ्यांऐंशी हजार तीस फक्त) प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६० विषय क्रमांक – ६

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/११/कावि/६९/२०१५ दि.१३/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस् ऑफ इंडिया हि केंद्र शासन अंगीकृत संस्था असल्याने त्यांनी दिलेल्या दराने निविदा न मागविता थेट पद्धतीने दि.२८.०८,२०१२ चे करारनामा अटी व शर्तीप्रमाणे कामकाज करणेस व दि.०१.०७.२०१५ ते दि.३०.०९.२०१५ या कालावधीत 46 MBPS (1:1) बँडविड्थ चार्जेस व १६ कार्यालये Link द्वारे मुख्य कार्यालयाशी जोडणेकामी तीन महिने कालावधीकरीता मुदतवाढ देऊन सेवा उपलब्ध करणेसाठी येणारा एकूण खर्च र.रु.७,०९,४००/- (अक्षरी र.रु.सात लाख नऊ हजार चारशे फक्त) अधिक कर अथवा थेट पद्धतीने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६१ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/११२/२०१५ दि.२०/७/२०१५

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/२०१३-२०१४ मधील अ.क्र.३० अन्वये, प्रभाग क्र.१८ किवळे विकासनगर मधील प्रगती कॉलनी, टी.सी. कॉलनी व पेंडसे कॉलनी मधील उर्जा बचती अंतर्गत नादुरुस्त फिटिंग बदलणेकामी मे.जगनाडे इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.११,२४,९५५/- (अक्षरी र.रू.अकरा लाख चोवीस हजार नऊशे पंचावन्न) पेक्षा १०.२७ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६२ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२८१/१५ दि.२०/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.२१ अन्वये, सांगवी येथील प्रभाग क्र.५९ परिसरात सुधारणा करणेसाठी ठिकठिकाणी पाईप लाईन टाकणे, जोड करणे, वॉल्व्ह बसविणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.अनिकेत एंटरप्रायझेस (निविदा रक्कम रू. १०,४८,५५८/- (अक्षरी र.रू. दहा लाख आठ्ठेचाळीस हजार पाचशे अठ्ठावन्न फक्त) पेक्षा ४१.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,३८,६८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६३ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२८२/१५ दि.२०/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.३४ अन्वये, सांगवी येथील प्रभाग क्र.५८ परिसरात सुधारणा करणेसाठी ठिकठिकाणी पाईप टाकणे, जोड करणे, व्हाल्व बसविणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आविष्कार कन्स्ट्रक्शन (निविदा रक्कम रू.१०,४८,५५८/- (अक्षरी र.रू. दहा लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे अठ्ठावन्न फक्त) पेक्षा ४१.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,३८,६८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये

झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६४ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२८३/१५ दि.२०/७/२०१५

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/३५/२०१४-१५ मधील अ.क्र.२७ अन्वये, सांगवी येथील प्रभाग क्र.६० परिसरात सुधारणा करणेसाठी ठिकठिकाणी पाइप टाकणे, जोड करणे, वॉल्व्ह बसविणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आविष्कार कन्स्ट्रक्शन (निविदा रक्कम रू. १०,४८,५५८/- (अक्षरी र.रू. दहा लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे अठ्ठावन्न फक्त) पेक्षा ४१.९९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,३८,६८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६५ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी३/कावि/८४५/२०१५ दि.१०/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाच्या सन २०१५-१६ च्या मूळ अर्थ संकल्पामध्ये रूग्णालयामार्फत र.रू.१,००,००,०००/- ची तरतूद सुचविणेत आली होती, परंतु लेखा विभागाने विद्यावेतन या लेखाशीर्षावर र.रू.५०,००,०००/- इतकी तरतूद केलेली आहे. सदर खर्चातून आजपर्यंत र.रू. २४,५५,९४०/- इतका खर्च झालेला असून र.रू.२५,४४,०६०/- शिल्लक आहे. सध्या सीपीएस टिचर्स यांचे विद्यावेतन र.रू.२६,००,०००/- इतके अदा करणे बाकी आहे. तसेच पुढील कालावधीतील सीपीएस चे मानधन र.रू.७४,००,०००/- इतकी रक्कम अदा करणे अपेक्षित आहे. सदर रकमेची पुर्तता करणेकामी यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील मूळ अंदाज पत्रकातील औषध खरेदी या लेखाशिर्षकातुन र.रू.१,००,००,०००/- वर्ग करणे शक्य आहे. तरी यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील औषध खरेदी या लेखाशीर्षावरील र.रू. १,००,००,०००/- विद्यावेतन या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६६ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२८५/२०१५ दि.२१/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा नोटीस क्र. १६/१/२०१४-१५अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता ५०० मे.टन लिक्विड क्लोरीन वायु खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व शर्तीनुसार ५ निविदा पात्र असून त्यापैकी मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांची र.रू.७,९५०/- प्र.मे. टन दराची लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये लिक्वीड क्लोरीन वायु हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असणे गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.५ नुसार सदरची खरेदी ६०:४० या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ६० % व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या ४० % परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. सदर अटीनुसार एकूण परिमाणाच्या ६० % प्रमाणे मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि.यांचेकडून ३०० मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस र.रू.७,९५०/- प्र.मे. टन या दराने खरेदी करणेस मा.आयुक्त यांनी दि. ३०/०४/२०१५ चे प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे. व उर्वरित ४० % पुरवठा करणेसाठी याकामी मे.रंग रसायन व मे.केमिकल पिपल या दोघांचे निविदा दर एकच म्हणजे र.रु.९,४९५/- प्र.मे. टन असा असल्याने व दोघांनी सुधारित र.रु.७,९५०/- प्र. मे. टन दराने द्रवरूप क्लोरिन पुरवठा करणेस तयार आहेत. तरी 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजे र.रू.७,९५०/- प्र.मे.टन प्रमाणे 2nd Lowest मे.रंग रसायन यांचेकडून १००.०० मे.टन व मे.केमिकल पिपल यांचेकडून १००.०० मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस (एकत्रित अपेक्षित खर्च रू.१५,९०,०००/- [अक्षरी र.रू.पंधरा लाख नव्वद हजार फक्त]) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६७ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – पाणीपुरवठा

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२९३/२०१५ दि.२१/०७/२०१५

विषय - जलक्षेत्र क्र.बी/२ अंतर्गत पुनावळे येथील पाण्याच्या उंच टाकीचे आऊटलेट हायवे क्रॉसिंग करून जुन्या लाईनला जोडणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६८ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/४९८/२०१५ दि.२९/०६/२०१५

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११३ दिनांक १७/०७/२०१५ नुसार, मनपाचे क्रीडा विभागाकडील ई-निविदा नोटीस क्र.१/२-२०१३-२०१४ थेरगांव जलतरण तलाव पाणी

शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दरुस्ती कामासाठी प्राप्त झालेले फर्स्ट लोएस्ट ठेकेदाराचे संत गाडगेबाबा महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, पिंपरी यांचे २ वर्षाचे लघुत्तम दरानूसार १ल्या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,०८,९००/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च र.रु.१३,०६,८००/- तसेच दुस-या वर्षाचा दरमहा दर र.रु.१,१९,७९०/- या दराने १२ महिने कामासाठी येणारा खर्च रक्कम रुपये १४,३७,४८०/- एकूण र.रु.२७,४४,२८०/- (अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे ऐंशी फक्त) चे कामकाज सेकंड लोएस्ट ठेकेदार मे.वरदायिनी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे ३३ यांचेकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०६९ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६८/२०१५ दि.०२/०७/२०१५

२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११४दिनांक १७/०७/२०१५ नुसार,

विषय - मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७० विषय क्रमांक – १६

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – क्रीडा

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/०९/कावि/६९/२०१५ दि.०२/०७/२०१५

२) मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११५ दिनांक १७/०७/२०१५ नुसार,

विषय - मनपाचे संभाजीनगर येथील व्यायामशाळेकरिता व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७१ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०४/०८/२०१५

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भः- १) मा.सुरेश म्हेत्रे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११९ दिनांक १७/०७/२०१५ नुसार, से.२२ झेड क्लस्टर हॉल, राहुलनगर, निगडी येथे ३ कॅरम व त्या अनुषंगाने साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७२ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०८/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०१ अन्वये, प्रभाग क्र.६ मध्ये डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू.९,३३,६६८/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सहाशे अड्सष्ट) पेक्षा ३०.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७३ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०७/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०५ अन्वये, प्रभाग क्र.३२ मध्ये डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू.७,५०,०००/- (अक्षरी र.रू.सात लाख पन्नास हजार) पेक्षा ३०.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७४ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.विमल काळे

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२१२/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०६ अन्वये, प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण व धावडेवस्ती येथे मनपाच्या ताब्यात येणा-या रस्त्यांचे खडीमुरुमीकरण व बी.बी.एम. करणेकामी मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.७,०७,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा ३५.४० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७५ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२१०/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०३ अन्वये, प्रभाग क्र.६ मोशी, कुदळेवस्ती येथे स्टॉर्म वॉटर गटर व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवगंगा कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.५,६०,०९२/- (अक्षरी र.रू.पाच लाख साठ हजार ब्यान्नव) पेक्षा ३७.९९ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७६ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०५/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.१५ अन्वये, प्रभाग क्र.३५ धावडेवस्ती येथील राहिलेच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू.७,०७,२८०/-(अक्षरी र.रू.सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा २९.१०% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७७ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय

सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०९/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०७ अन्वये, प्रभाग क्र.३५ मध्ये डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे कामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू.७,००,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख दोनशे ऐंशी) पेक्षा ३०.००% कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७८ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२०६/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.२० अन्वये, प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण येथील राहिलेल्या रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू.७,०७,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख सात हजार दोनशे ऐंशी) पेक्षा २७.६० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०७९ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२११/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.१० अन्वये, प्रभाग क्र.३१ मध्ये डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे कामी मे.एच.सी.कटारिया (नि.र.रू.७,००,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख दोनशे ऐंशी) पेक्षा ३०.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८० विषय क्रमांक – २६
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/२५२/१५ दि.२१/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या इ क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/२३-२०१४/२०१५ मधील अ.क्र.०९ अन्वये, प्रभाग क्र.३१ दिघी मधील विविध ठिकाणी बोर्ड बेंचेस व वाचनालय इ. स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.अनिकेत एंटरप्रायजेस (नि.र.रू.७,००,२८०/- (अक्षरी र.रू.सात लाख दोनशे ऐंशी) पेक्षा २९.९९ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८१ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – झो.नि.पु.स्थापत्य

सुचक-मा.संपत पवार अनुमोदक-मा.धनंजय आल्हाट

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/BSUP/२६२/२०१५ दि.२१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत BSUP/JnNURM अंतर्गत राबविणेत येत असलेल्या वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची अनुमती (Consent to Establish) मिळालेली आहे. यापूर्वीच्या वेताळनगर पुनर्वसन प्रकल्पातील इमारत क्र.A-4, A-11 व A-10, A-3, A-9, A-8 या इमारतींना MPCB चा Consent to Operate मिळालेले आहे. तसेच A-7 चा प्रस्ताव दि.५/५/२०१५ रोजी मंजुर झालेला आहे. वेताळनगर पुनर्वसन प्रकल्पातील A-5 या इमारतीकरीता Occupation Certificate साठी अर्ज करण्यापूर्वी Consent to Operate मिळणे आवश्यक आहे. यापूर्वी वेताळनगर मधील A-4, A-11, A-3, A-10, A-9, A-8 आता Fee Structure नुसार वेताळनगर पुनर्वसन प्रकल्पातील A-5 व या इमारतीसाठी Consent to Operate प्राप्त करण्यासाठी शुल्क र.रु.१५०००/- व फॉर्म फी १००/- या प्रमाणे र.रु.१५,१००/- इतकी फी भरणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन A-5 इमारतीकरीता MPCB कडून Consent to Operate मिळणेसाठी शुल्क र.रु.१५,०००/- व अधिक फॉर्म फी र.रु.१००/- असे एकुण र.रु.१५,१००/- (अक्षरी र.रू.पंधरा हजार शंभर) त्यांचेकडे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८२ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/९९/२०१५ दि.२१/७/२०१५

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जुन, २०१५ मधील अद्ययावत एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८३ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग –मध्यवर्ती औषध भांडार

सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१४८/२०१५ दि.२३/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दवाखाने/रूग्णालयासाठी आवश्यक असणा-या वार्षिक मागणीनुसार औषध/साहित्य खरेदीकामी ई-निविदा क्र.४/२०१४-२०१६ नुसार (दोन वर्षाकरिता) चांगल्या व गुणात्मक कंपन्या प्राप्त व्हाव्यात यासाठी नाव नोंदणी व कंपनी निवड नोटीस क्र. दै.लोकमत, दै.केसरी, दै.पुढारी व दै.सामना या वृत्तपत्रांमध्ये व म.न.पा वेबसाईटवर औषधे/साहित्याची यादी संख्येसह प्रसिध्द करणेत आली होती. Allopathic Medicine -870 Item, Surgical item 560, Ayurvedic

Medicine-286, Dental Item-289 व Homeopathic Medicine-81 असे एकुण 2086 item औषधे/साहित्याचा निविदेत समावेश होता. त्यानुसार दोन वर्षाकरिता औषधे/साहित्य खरेदी करणेकामी ५ प्रकारच्या निविदा (Allopathic Medicine Purchase 4/1, Surgical Item 4/2, Ayurvedic Medicine 4/3, Dental Item 4/4 & Homeopathic Medicine 4/5) मागविणेत आल्या. या निविदा नोटीसमध्ये नमुद केलेनुसार कंपनीचे मुळ अधिकृत विक्रेत्यांची पत्रे निविदाधारकांनी भांडारात जमा केली होती. पैकी Homeopathic Medicine चे एकाही अधिकृत विक्रेत्याचे पत्र प्राप्त झाले नाही. यामुळे प्राप्त झालेल्या अधिकृत विक्रेत्याच्या पत्रांवरून गुणात्मक दृष्ट्या चांगल्या कंपनीची निवड औषधे निवड समितीने केल्या आहेत. निविदाधारकांनी निविदा सादर केल्यानंतर निविदा कमिटीने निविदा उघडले त्यानुसार (Allopathic Medicine Purchase 4/1, Surgical Item 4/2, Ayurvedic Medicine 4/3, Dental Item 4/4 & Homeopathic Medicine 4/5) निविदा प्राप्त झाल्या व त्यानुसार मा.स्थायी समिती सभा यांची ठराव क्र.८११९ दिनांक–०२/०९/२०१४ अन्वये सन २०१४-१५ करिता खर्चास मान्यता घेणेत आली आहे. निविदा दोन वर्षाकरीता असल्याने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता मंजुर दरानुसार औषधे/साहित्य खरेदीकामी अंदाजपत्रकात ९ कोटी ची तरतुद केली असुन मागील दोन वर्षाचा खर्च पाहता ९ कोटी रूपये ऐवजी ८ कोटी खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. निविदा दरानुसार औषधे/साहित्य खरेदीकामी होणारा खर्च 'औषधे खरेदी' या लेखाशिर्षातुन भागविणे शक्य आहे. सबब सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता मंजुर दरानुसार औषध खरेदीसाठी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८४ विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१६/६९५/२०१५ दि.२०/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपासाठी पुनावळे येथील वनजमीन प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत कैन्द्र शासनाकडील पत्र क्र.6MHCO49/2006-BHO/832, Dt.17/04/2008 अन्वये सं.न.२४ पुनावळे येथील २२.८ हेक्टर वनजमीन वळती करण्यास तत्वतः मान्याता दिली आहे. सदर वनजमीन ३० वर्षे करीता मंजूर केली असून त्यासाठी महानगरपालिकेने वनविभागास विविध आकारापोटी अट क्र.२ (ब), अट क्र.४(ड), अट क्र.६, अट क्र.९, अट क्र.११(ब) मधील वृक्षलागवडीचा खर्च व अट क्र.१२ असा एकूण र.रू.२,६३,५७,७५०/- व तसेच अट क्र.११(अ) मधील वृक्षतोडीचा खर्च रक्कम रू.८१,३९९/- असे एकूण र.रू.२,६४,४८,०१६/- चा दि.११/११/२०१० च्या धनादेशाव्दारे मा.स्थायी समितीच्या मंजूर ठराव क्र.११०७१, दि.४/०५/२०१० व ठराव क्र.१२२३५, दि.५/१०/२०१० नुसार अदा केले आहे. त्याचबरोबर मंजूर अटीप्रमाणे वनविभागास पर्यायी वनेत्तर क्षेत्र म्हणून गट.नं.३०१ पिंपरी पौड येथील शासकीय जमीन द्यावयाची आहे. सदर जमीन हस्तांतराबाबत शासन स्तरावर सद्यस्थितीत कार्यवाही चालू असून मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचेमार्फत दि.२०/०३/२०१४ रोजी पत्र क्र.मह-२/जमीन-पुणे/सीआर/ जागामागणी/ ८५ अन्वये महसूल व वनविभाग, ज-५, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर करणेत आला आहे. उपवनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे यांचे मागणीप्रमाणे पर्यायी वनीकरणा अंतर्गत सन २०१०-११ मधील र.रू.७८,०८०/- या दराप्रमाणे २२.८० हे. क्षेत्रासाठी १७,८०,२२४/- रक्कम अदा करणेत आली होती. सन २०१४-१५ मधील (सुधारीत दराप्रमाणे)

३,७३,०४४ या दराप्रमाणे २२.८० हे. क्षेत्रासाठी र.रू.८५,०५,४०३/- इतकी रक्कम परीगणीत होत असल्यामुळे सदर रक्कम पुर्वी भरणेत आलेली र.रू.१७,८०,२२४/- मधून वजा केली असता र.रू ६७,२५,१७९/- इतकी रक्कम मा.स्थायी समितीच्या मंजूर ठराव क्र.११०७७, दि.१७/०३/२०१५ नुसार पर्यायी वनीकरणाअंतर्गत उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग यांचेकडे अदा करणेत आली आहे. उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.कक्ष-६/जमीन/टी-४/२०४/२०१५-१६, दि.२२/०४/२०१५ अन्वये सन २०१५-१६ साठी शासनाने निर्गमित केलेल्या रेडी रेकनर दर र.रू.४,१०,३५०/- प्रति हेक्टरी प्रमाणे २२.८० हेक्टर क्षेत्रासाठी र.रू.९३,५५,९८०/- इतकी रक्कम परिगणीत होत असल्यामुळे यापुर्वी पर्यायी वनीकरणा अंतर्गत भरलेली सन २०१०-११ साठी र.रू.१७,८०,२२४/- व सन २०१४-१५ साठी र.रू.६७,२५,१७९/- असे एकूण मिळून भरलेली र.र.८५,०५,४०३/- वजा करता फरकाची र.रू.८,५०,५७७/- इतकी रक्कम कॅम्पा, कॉर्पोरेशन बँक, नवी दिल्ली यांचे खाते क्र.०३७१००१०१०२५२१८ या खात्यावर आर.टी.जी.एस.व्दारे भरणा करणेची मागणी केली आहे. सदर अटींची पुर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव विधिवत मंजूरीसाठी यथोचित मार्गाने केंन्द्र शासनाकडे सादर करणेत येईल असे कळविले आहे. सबब प्रस्तूत प्रकरणी संबधित उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे पर्यायी वनीकरण अंतर्गत सन २०१५-१६ (सुधारीत दरानुसार) नुसार फरकाची र.रू.८,५०,५७७/- अदा करणे आवश्यक असल्याने नगररचना विभागाकडील भूसंपादन निधी या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकणेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८५ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – माध्यमिक शिक्षण

सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८४/२०१५ दि.२३/०७/२०१५

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला असे कोणतेही लेखाशिर्ष नसल्याने सदरची खाजगी मान्यताप्राप्त विदयालयाकडील विदयार्थ्यांकडुन **२५ टक्के** रक्कम जमा करण्याबाबत नव्याने लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला **खाजगी विदयार्थी बसपास २५ टक्के रक्कम जमा** हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८६ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/५९३/१५ दि.२१/७/२०१५
मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे गणवेश देय कर्मचा-यांना (तीन पाळीत काम करणारे) हिवाळी साधने खरेदीकामी निविदा सुचना क्र.४/२०१५-१६ अन्वये ऑनलाईन प्रसिध्द करणेत आली होती. प्राप्त निविदे मधिल मे.शिवसमर्थ एंटरप्राईजेस प्राधिकरण यांचे बाब क्र.१ ते ४ साठी एकुण र.रु.३,९१,८४६/- (अक्षरी र.रू.तीन लाख एक्यान्नव हजार आठशे शेहेचाळीस) प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास व त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८७ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय,पाणीपुरवठा
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.बप्र/लेखा/९/कावि/२१४/२०१५ दि.२२/७/२०१५
मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/२५-२०१४-१५ अन्वये सन २०१४-१५ साठी जलक्षेत्र क्र.बी.५ अंतर्गत पाणीपुरवठा विषयक कामाची देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.अनिकेत इंटरप्रायजेस (नि.र.रु.९,१०२०१/- (अक्षरी र.रु नऊ लाख दहा हजार दोनशे एक फक्त) पेक्षा -४०.२७ % कमी) या ठेकेदारांकडून निविदा मंजूर दराने र.रु.५,७०,८४६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०८८ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०४/०८/२०१५ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक-मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५३९/१५ दि.२२/७/२०१५
मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मध्यवर्ती भांडार विभागाकडे छपाई साहित्य (हँड बिल्स, फॉर्म्स, रजिस्टर) तसेच स्टेशनरी कागद खरेदी मोठया प्रमाणावर होत असते. सदर साहित्यामध्ये जी.एस.एम. (ग्रॅम पर स्केअरमीटर g/sm) ही एक बाब अत्यंत महत्वाची असते. त्यासाठी मध्यवर्ती भांडार विभागाने जीएसएम मशिन खरेदीकामी कोटेशन नो.क्र. ४८/२०१५-१६ अन्वये बंद पाकीटात दरपत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार एकुण 03 कोटेशन नोटीस दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकातील लघुत्तम कोटेशनधारक मे.राऊत

सायंटिफिक & जनरल टेड्रर्स, पुणे यांचे जीएसएम मशिन खरेदीकामी एकुण र.रु.४४,०५०/- (अक्षरी र.रु.चव्वेचाळीस हजार पन्नास फक्त) चे दर स्विकृत करणेत आले असुन त्यांचेबरोबर करारनामा करणेत आला असून प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७५/२०१५
दिनांक - ०४/०८/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.